क्रमांक : ४४८४ / क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०२०

**संदर्भ :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : समय-२०१६/प्र.क्र.६२/१८ (र. व का.), दिनांक २४ फेब्रुवारी, २०२०.**

राज्य शासनाच्या संदर्भाधिन शासन निर्णयान्वये राज्यातील शासकीय कार्यालयांसाठी पाच दिवसांचा आठवडा दिनांक २९ फेब्रुवारी, २०२० पासून लागू करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास पाच दिवसांचा आठवडा लागू करण्याबाबत मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद आणि मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचा समावेश असलेल्या मा.मंडळाने निर्णय घेतलेला असून त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत :-

**:: कार्यालयीन आदेश ::**

१) या सचिवालयास दिनांक २९ फेब्रुवारी, २०२० पासून पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यात येत असून त्यामुळे सर्व शनिवार व रविवार हे सुट्टीचे दिवस असतील. तथापि, सत्र कालावधीत सभागृहाची विशेष बैठक शनिवारी घेण्याचा निर्णय झाल्यास, या सचिवालयाचे कार्यालय शनिवारी देखील सुरु राहील.

२) या सचिवालयाच्या कार्यालयीन कामकाजाची वेळ **नि:सत्र कालावधीसाठी** ४५ मिनीटांनी वाढविण्यात येत असून ती खालीलप्रमाणे राहील :-

(अ) वर्ग 'अ' ते वर्ग 'क' (दूरध्वनीचालक वगळून) या संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांची कार्यालयीन कामकाजाची वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी १०.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी राहील.

(ब) वर्ग 'क' संवर्गातील 'दूरध्वनीचालक' या पदावरील कर्मचाऱ्यांची कार्यालयीन कामकाजाची वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी १०.१५ ते सायंकाळी ७.१५ अशी राहील. ***(कार्यालयाने निश्चित केलेल्या वेळेचे नियोजन 'दूरध्वनीचालक' पदावरील कर्मचारी आपसात निश्चित करतील व याबाबत आस्थापना कक्षास अवगत करतील.)***

..२/-

(क) वर्ग 'ड' (मुकादम, मुख्य मदतनीस, मुख्य सफाईदार, मदतनीस, सफाईदार वगळून) संवर्गातील कर्मचाऱ्यांची कार्यालयीन कामकाजाची वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.३० अशी राहील.

(ड) वर्ग 'ड' संवर्गातील मुकादम, मुख्य मदतनीस, मुख्य सफाईदार, मदतनीस व सफाईदार या कर्मचाऱ्यांची कार्यालयीन कामकाजाची वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी ८.०० ते दुपारी ३.४५ अशी राहील.

३) या सचिवालयाच्या कार्यालयीन कामकाजाची वेळ **सत्र कालावधीत** पूर्वीप्रमाणे म्हणजेच पुढीलप्रमाणे राहील :-

| अ.क्र. | पदनाम / संवर्ग | कार्यालयात उपस्थित राहण्याची वेळ | कार्यालय सुटण्याची वेळ |
|---|---|---|---|
| (१) | वर्ग अ ते वर्ग क (दूरध्वनीचालक वगळून) | सकाळी ९.३० | सायंकाळी ६.३० |
| (२) | वर्ग क (दूरध्वनीचालक)<br>*(कार्यालयाने निश्चित केलेल्या वेळेचे नियोजन दूरध्वनीचालक पदावरील कर्मचारी आपसात निश्चित करतात.)* | सकाळी ८.४५ | सायंकाळी ७.३०<br>*(तथापि, कार्यरत कर्मचाऱ्यांपैकी एक दूरध्वनीचालक सभागृह संपेपर्यंत उपस्थित राहील)* |
| (३) | वर्ग ड (मुकादम, मुख्य मदतनीस, मुख्य सफाईदार, मदतनीस, सफाईदार वगळून) | सकाळी ९.०० | सायंकाळी ६.४५ |
| (४) | वर्ग ड (मुकादम, मुख्य मदतनीस, मुख्य सफाईदार, मदतनीस, सफाईदार) | सकाळी ७.३० | दुपारी ४.०० |
| (५) | सुरक्षा विभाग, अग्निशमन विभाग, पहारेकरी | दिवसाच्या तीन सत्रामध्ये काम चालते (१ ली पाळी, २ री पाळी आणि ३ री पाळी) | |

४) उपरोक्त नमूद **नि:सत्र व सत्र कालावधीतील** कार्यालयीन वेळेमध्ये दुपारी १.०० ते २.०० या वेळेमधील जास्तीत जास्त अर्ध्या तासाची भोजनाची सुट्टी अंतर्भुत असेल.

५) विधान भवन इमारतीची संवेदनशीलता व सुरक्षितता विचारात घेता सुरक्षा विभाग व अग्निशमन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना तसेच 'पहारेकरी' या संवर्गात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पाच दिवसांच्या आठवड्याबाबतचे आदेश लागू राहणार नाहीत.

आपला,

( राजेन्द्र भागवत )
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

..३/-